
ISSN-2277-4491

# VIBGYOR

Bi-annual Multi Disciplinary Research Journal

Volume VII No. 1 February 2018

2017-18



# अनुक्रमणिका


१. सिंदखेडकर जाधवांची ऐतिहासिक कामगिरी — प्रा. डॉ. शरद आर. डवरे ........ ७
२. यशवंत मनोहर यांची कविता — डॉ. जगदिश्वर मुरारी मेश्राम ........ १०
३. भारतीय शेतकरी आणि भारतीय कृषी विषयक धोरण — प्रा.डॉ. राजेश पी. कांबळे ........ १३
४. नोंटबंदीमुळे अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम — प्रा. डॉ. सुरेंद्र पोथारे ........ १७
५. आमनेर किल्ला - एक ऐतिहासिक दृष्टीक्षेप — प्रा. डॉ. विलास भा. फरकाडे ........ १९
६. महात्मा ज्योतिबा फुलेंचा सामाजिक विचार — प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड ........ २२
७. चिमूरचे श्रीहरी बालाजी मंदीर : ऐतिहासिक दर्शन — प्रा. डॉ. नथ्थु सिताराम गिरडे ........ २५
८. कुसमायोजित विद्यार्थ्यांच्या विविध समस्या, उपाययोजंना व पालकांची भुमिका — डॉ. सौ. शुभांगी अ. रोडे ........ २७
९. नागपूर जिल्ह्यातील म्हाडाच्या मध्यम उत्पन्न गटातील गाळ्यांचे गृहआयोजन सिध्दांतानुसार मूल्यमापन — डॉ. सुजाता साखरे ........ ३०
१०. नागपूर जिल्ह्यातील धर्मांतरीत बौध्दाच्या आर्थिक समस्या — प्रा. किशोर जगन्नाथ शेन्डे, डॉ. सुनिल शिंदे ........ ३३
११. नागपूर जिल्ह्यातील पेंच जलसिंचन प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या गावातील शेतकऱ्यांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषनात्मक अध्ययन — विजय मारोतराव रोडे, डॉ. सतिश पुंडलीकराव डुडुरे ........ ३५
१२. बंजारा समाजातील राजकीय स्थित्यंतरे — डॉ. मोतीराज रा. चव्हाण ........ ३९
१३. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या बिकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकासासंबंधी स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन — प्रा. डॉ. दिलीप चव्हाण ........ ४२
१४. ग्रामीण कृषी उद्योग आणि लहान शेतकऱ्यांचा विकास : समस्या आणि आव्हाने — डॉ. गजानन भा. पाटील ........ ४५
१५. खेळाडूवर आहाराचा प्रभाव — प्रा. आदित्य किशोर सारवे ........ ५०
१६. नागपूर शहरातील औद्योगिक प्रतिष्ठानाकडून सी.एस.आर. योजनेमार्फत राबविण्यात येणारे विविध कार्यक्रमाचे अध्ययन — डॉ. अशोक धोटे ........ ५२
१७. ऐतिहासिक कागदपत्रांची निवड — डॉ. महेंद्र गायकवाड ........ ५५
१८. बाबु हरिदास आवळे व कामगार चळवळ : एक समिक्षात्मक अध्ययन — प्रा. डॉ. सी. एस. पाटिल ........ ५८
१९. भंडारा जिल्ह्यातील साहित्य कलेत गुंतलेला आदिम समाज — डॉ. मधुकर वि. नंदनवार ........ ६२
२०. भंडारा जिल्ह्यातील स्त्रियांची अप्रकाशित लोकगीते — सदानंद कोठीराम जांगळे ........ ६५
२१. भंडारा जिल्ह्यातील अप्रकाशित लोकगीतांचे वाङ्मयीन सौंदर्य — सदानंद कोठीराम जांगळे ........ ६७
२२. महिला सशक्तीकरण : एक दृष्टीकोन — प्रा. डॉ. विमल राठोड ........ ६९
२३. शालेय वातावरणाचा व्यक्तीमत्वावर पडणारा प्रभावः एक विश्लेषण — प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार ........ ७२
२४. बदलत्या युगातील "शिक्षक ग्रंथपाल" - एक सर्वेक्षण — प्रा. प्रेमा ए. कुभंलकर ........ ७६
२५. यशवंत मनोहर यांच्या कवितेची भाषा — वैशाली धनविजय ........ ७९
२६. गौतम बुदधाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण — डॉ. दीपाली डी. भावे ........ ८२
२७. मानवी अधिकार आणि एड्स — प्रा. डॉ. विठ्ठल धिनमिने ........ ८४
२८. मराठी नाटकांचे सांस्कृतिक योगदान — डॉ. रवींद्र शोभणे ........ ८६
२९. युगपुरुष शिवराय : एक आकलन — प्रा. डॉ. प्रफुल्ल तु. बन्सोड ........ ८८
३०. लोकमाता अहिल्यादेवी होळकर — प्रा. प्रफुल एम. राजुरवाडे ........ ९२
३१. स्थानिक नागरीकांच्या अभिवृत्तीचे अध्ययन
३२. विदर्भातील पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या विकासात्मक प्रयत्नांचा आढावा व विकासासंबंधी — प्रा. हरेश टि. गजभिये ........ ९४
३३. जागतिकीकरण आणि सामाजिक प्रश्न — डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. अनिल बोपचे ........ ९७
३४. विदर्भ के मुस्लिम बहुल क्षेत्र के छात्रों की सामाजिक एवं आर्थिक परिस्थिती का उनकी अभिवृत्ति पर होने वाले परिणामों का अध्ययन — नाजिश इरम तुफैल अशर, डॉ. एन.ए. काजी ........ ९९
३५. डॉ. बाबासाहब आम्बेडकर के नागपूर धम्मदीक्षा समारोह में वामनराव गोडबोले का योगदान — डॉ. सुर्यकांत महादेवराव कापशीकर ........ १०१
३६. बुध्द और उनका अष्टांग मार्ग — डॉ. अतुल महाजन ........ १०३

# शालेय वातावरणाचा व्यक्तीमत्वावर पडणारा प्रभाव: एक विश्लेषण

❑ प्रा. डॉ. अनिता विवेक महावादीवार
भिवापूर महाविद्यालय, भिवापूर
वाणिज्य विभाग

**सारांश :**

आजच्या आधुनिक व स्पर्धात्मक युगात व्यक्तीला अनेक भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत व सामाजिक जाणिवांच्या आधुनिक काळात व्यक्तिमत्वाला अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. बुध्दी, भावना संवेदनशीलता, भिन्न दृष्टिकोन, अडचणी यांना सामोरे जाण्याची क्षमता, परिस्थितीशी जुळवून घेण्याचे कौशल्य, शिक्षण, संस्कार व अनेकविध गोष्टींनी व्यक्तिमत्व घडत असते. कोणत्याही दोन व्यक्तींचे व्यक्तिमत्व पूर्णतः सारखे रहात नाही. एवढेच नव्हे तर दोन जुळ्यांच्याही व्यक्तिमत्वात वेगळेपणा असलेला आढळून येतो. म्हणजेच व्यक्तिमत्वाचे मूळ केंद्र हे सुप्त घटकांनी तयार झालेले असून त्याचे स्वरूप प्रेरणात्मक असते. व्यक्तिमत्वाचा हा प्रमुख प्रवाह होय. ह्या प्रमुख प्रवाहाभोवती निरनिराळी लक्षणे संयुक्त होऊन व्यक्तिमत्वाला वैशिष्यपूर्ण आकार प्राप्त होतो. मुलांवर लहानपणापासून आई-वडीलांचा तर प्रभाव पडतो परंतु पुढे तो कुटुंबातून शाळेत जायला लागतो तेव्हा शालेय वातावरणाचा सुध्दा प्रभाव त्याच्या व्यक्तिमत्वावर पडत असतो. शालेय वातावरणात महत्वाचे असणारे घटक म्हणजे शिक्षक व मित्र परिवार होय. तेव्हा शिक्षक व मित्र परिवारांच्या सहवासात जेव्हा तो मुलगा येतो. तेव्हा त्याला ज्या शिक्षक व मित्रांचा सहवास लाभेल त्याचप्रमाणे त्या मुलाचे व्यक्तिमत्व घडत असते. मैत्री ही मानवी जीवनातील जमेची बाजू आहे. मैत्रीच्या आधारावरच व्यक्ती जीवनातील सुख-दुखाचा प्रवास सहजरित्या करू शकतो. अशीच ही मैत्री शालेय वातावरणात होतांना दिसून येते. मात्र शालेय वातावरणात राहतांना प्रत्येक मुलाने सहवासात येणाऱ्या व्यक्तिकडून काय घेतले पाहिजे किंवा कोणत्या गोष्टी टाळल्या पाहिजे हे ठरविणे अत्यंत महत्वाचे ठरते. कारण त्यावरूनच त्याच्या व्यक्तिमत्व विकासाची घडण व विकास अवलंबून असतो.

देशाची प्रगती ही तरूण तरूणींच्या हाती असून, तरूण पिढी योग्य संस्कारक्षम आणि प्रभावी व्यक्तिमत्वाची तयार होणे काळाची गरज आहे. तेव्हा तरूण तरूणींनी चांगले काय किंवा वाईट काय याचा परिपूर्ण विचार करूनच वास्तविकतेचा स्वीकार करावा आणि निखळ मैत्री करून एकमेकांच्या सहवासातून उज्वल व्यक्तिमत्वाची निर्मिती करावी.

**प्रस्तावना :**

मानवी जीवनात व्यक्तीला अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यामुळे व्यक्तिमत्वाचा योग्य विकास होणे गरजेचे आहे. कारण त्या आधारावरच तो आपली सर्व कामे यशस्वीरित्या पार पाडू शकतो. आजच्या आधुनिक विज्ञान आणि स्पर्धेच्या युगात मानवी व्यक्तिमत्वाला फार महत्त्व प्राप्त झाले असून मानवी विकासाला हातभार लावणाऱ्या या घटकावर अनेक माध्यमातून प्रकाश टाकला जातो आणि ते योग्य देखील आहे. कारण योग्य व्यक्तिमत्वाच्या अभावी व्यक्ती समाजात आपला व्यवहार प्रभावीपणे करू शकत नाही. तेव्हा व्यक्तीचा उत्तम व्यक्तिमत्व विकास होणे ही काळाची गरज झाली आहे.

मानवी प्रगतीसाठी जमेची बाजू असणाऱ्या व्यक्तिमत्वाचा विकास व्यक्तीला विविध माध्यमातून करता येतो. पण सहज किंवा कमी कालावधीत व्यक्तिमत्वाचा विकास करता येतो ही समजूत करून घेणे फार चुकीचे आहे. व्यक्तिमत्वाची गरज केवळ युवकांनाच आहे असे नाही, तर सर्वच स्तरातील व्यक्तींना व्यक्तिमत्वाच्या विकासाची गरज जाणवू लागली आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासास त्याच्या बालपणापासूनच सुरूवात होते. शाळा, महाविद्यालये, घरातील मोठ्या व्यक्ती, शेजार, मित्रमंडळी या सर्वाचे व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासात महत्त्वपूर्ण योगदान असते. यापैकी एखादा घटक जरी कमकुवत असेल तरी व्यक्तिमत्वाचे विघटन व्हायला फारसा वेळ लागत नाही. व्यक्तिमत्व विकासात सावधानतेचा पवित्रा आत्मसात करणे फार गरजेचे आहे. तरच व्यक्ती आपल्या जीवनात खऱ्या अर्थाने यशस्वी होतो.

व्यक्तिमत्व विकासाला शालेय जीवनापासूनच सुरूवात होते. तेव्हा मुलांनी आपल्या व्यक्तिमत्वाला विविध पैलू प्रदान करायचे असतील तर व्यक्तिमत्व विकासाला हातभार लावणाऱ्या विविध माध्यमांचा पुरेपुर वापर करायला हवा. तरच पुढील भविष्यात आजचा विद्यार्थी ह्या स्पर्धात्मक युगात आपली प्रगती उत्तमरित्या करू शकेल. आज प्रत्येक क्षेत्राला चांगल्या व्यक्तिमत्वाचीच गरज आहे. प्रत्येक व्यवसायातील वरिष्ठ आणि व्यवस्थापक मुलाखतीच्यावेळी प्रभावी व्यक्तिमत्वाची निवड सर्वप्रथम करतात. कारण प्रभावी व्यक्तिमत्वाचा प्रभाव आणि त्यांचे काम करण्याची तऱ्हा ही सामान्य व्यक्तिपेक्षा निराळी असते.

उत्तम व्यक्तिमत्व साकार करण्यासाठी राहणीमानापासून, त्याचे शिक्षण, भाषेचे ज्ञान, वक्तृत्व, नेतृत्वाचे गुण, लेखनकला, उठण्या-

बसण्याची पध्दत, इतरांशी व्यवहार या सर्व घटकांचा अंतर्भाव झाल्यावरच उत्तम व्यक्तिमत्व साकार झाले असे आपण म्हणू शकतो. तेव्हा युवकांपासून सर्वांनीच व्यक्तिमत्वाच्या विकासाबाबत दक्ष असायला हवे. व्यक्तिमत्व काही एकाएकी साकार होत नाही. व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी व्यक्तीला सतत परिश्रम करावे लागतात. सतत दक्ष आणि जागरूक असावे लागते. तरच व्यक्तिमत्वाचा योग्य विकास शक्य आहे. आपले व्यक्तिमत्व अधिकाधिक प्रगल्भ व्हावे आणि चारचौघात आपण उठून दिसावे असे वाटत असेल तर अनेक बाबतीत दक्षता बाळगायला हवी. कारण आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात व्यक्तीला अनेक व्यक्तींशी संपर्क ठेवावा लागतो. तेव्हा व्यक्तीला केवळ एकाच विषयांवर नव्हे तर सर्वच विषयांवर थोडक्यात का होईना बोलता यावे किंवा प्रत्येक विषयातील माहिती असावी. तरच व्यक्तीचे व्यक्तिमत्व अधिक प्रभावशाली बनू शकेल.

**संशोधनाचा उद्देश :**

१. व्यक्तिमत्वाचा अर्थ समजावून घेणे.

२. व्यक्तिमत्व घडण व विकास ह्यांचे अध्ययन करणे.

३. व्यक्तिमत्व विकासावर शालेय वातावरणातील घटकांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन करतांना प्रामुख्याने द्वितीय स्त्रोतांचाच प्रामुख्याने उपयोग करण्यात आला.

**व्यक्तिमत्वाचा अर्थ :**

सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत व सामाजिक जाणिवांच्या आधुनिक काळात व्यक्तिमत्वाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. बुध्दी, भावना, संवेदनशील, भिन्न दृष्टिकोन, अडचणी यांना सामोरे जाण्याची क्षमता, परिस्थितीशी जुळवून घेण्याचे कौशल्य, शिक्षण, संस्कार या अनेकविध गोष्टींनी व्यक्तिमत्व घडत असते. व्यक्तित्व आणि व्यक्तिमत्व यात मूलभूत असा फरक आहे. प्रत्येक प्राणीमात्राला व्यक्तित्व असते कारण ती निसर्गदत्त देणगी आहे. पण मनुष्याला मात्र आपल्या सर्वोत्कृष्ट गुणांनी, विकसनशील प्रवृत्तीने आणि आपल्या वैशिष्ट्यपूर्ण वर्तनाने त्यात परिपक्वता आणावी लागते. त्याला मौलिक दर्जा मिळवून द्यावा लागतो. अशी प्रगल्भ अवस्था प्राप्त करून घेतली म्हणजे त्यातून प्रत्येक व्यक्तीला तिचे वेगळे स्वतंत्र व्यक्तित्व लाभलेले आपणास आढळून येते.

**व्यक्तिमत्वाची व्याख्या :**

१. वूडवर्थ - "व्यक्तिच्या संपूर्ण वर्तनाची गुणात्मकता म्हणजे व्यक्तिमत्व होय."

२. बॅरन - "व्यक्तिमत्व म्हणजे इतरांपासून असलेल्या वेगळेपणातून स्पष्ट होणारे व्यक्तीच्या ज्ञानात्मक, क्रियात्मक, भावनात्मक व शारीरिक वैशिष्ट्याचे संघटन होय."

३. गिलफोर्ड - "व्यक्तितील गुणविशेषाचा वैशिष्ट्यपूर्ण आकृतिबंध होय."

थोडक्यात, व्यक्तिमत्वात शारीरिक व मानसिक गुणवैशिष्ट्यांचा समावेश होतो की, जे व्यक्तीचे दर्शन व विचारांचे, निर्धारण करतात. व्यक्तीच्या विकासाला चालना देतात, ते संघटित स्वरूपात असतात व त्यामुळेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला संपूर्णत्व प्राप्त होते व त्या आधारे प्राप्त परिस्थितीशी समायोजन साधले जाते व प्रसंगी परिस्थितीत अपेक्षानुरूप बदलही घडवून आणला जातो.

**व्यक्तिमत्वाची घडण व विकास :**

व्यक्तिमत्वे दोन प्रकारची असतात. एक आत्मलक्षी दुसरे परलक्षी. आत्मलक्षी व्यक्तिमत्वाचा माणूस हा थोडाफार अलिप्त स्वभावाचा असतो. समाजापासून आणि इतर लोकांपासून अशा व्यक्तिमत्वाचा माणूस दूर जाण्याच्या प्रयत्नात असतो. आत्मलक्षी स्वभावाची माणसे फार स्वप्नाळू तसेच ध्येयवादी असतात. त्यांना इतरांसोबत घेणे देणे नसल्यामुळे या व्यक्तिमत्वाची मंडळी कुणावर फारसा अधिकार गाजवित नाही. या स्वभावाची व्यक्ती आपल्या गुणांचे फारसे प्रदर्शन करीत नाही. अतिशय विवेक आणि भावनिक स्वभावाची ही व्यक्ती कोणत्याही कामाला सुरूवात करण्यापूर्वी फार विचार करते

दुसरे व्यक्तिमत्व परलक्षी स्वभावाचे असते. या स्वभावाची व्यक्ती समाजात मिळून मिसळून वागत असतात. या स्वभावाच्या व्यक्ती व्यवहारी असतात. या स्वभावाच्या व्यक्तींना कलेत विशेष रूची असते. आपल्या सर्व गुणांचे मोठ्या प्रमाणात प्रदर्शन करण्याकडे यांचा कल असतो. या व्यक्ती समाजात मिळून मिसळून वागत असल्यामुळे कौतुकास लवकर पात्र होतात. परंतु प्रत्येक व्यक्तीमध्ये या दोन्हीही स्वभावाचे मिलन झालेले आपल्याला दिसून येते आणि त्यातूनच व्यक्तीचे व्यक्तिमत्व साकार झालेले असते.

कोणत्याही दोन व्यक्तीचे व्यक्तिमत्व पूर्णतः सारखे आढळत नाही. अनुवंश व जन्मपूर्व परिवेशामुळे प्रत्येक मूल दुसऱ्या मुलापेक्षा निराळे दिसते. व्यक्तिमत्व लक्षणांची निर्मिती जन्मतःच होत नाही. ती होण्यासाठी मुलाचे वय निदान चार सहा महिन्याचे असले पाहिजे. ह्या वयात समायोजनदृष्ट्या काही सवयी मूल आत्मसात करू लागते. नंतर हळूहळू भौतिक आणि सामाजिक वातावरणाशी समायोजन करण्याचे काही वर्तनप्रकार मुलांकडून संपादन केले जाऊ शकतात.

परंतु असे असले तरी नवजात शिशूंच्या वर्तनातील काही फरक वाढत्या वयानुसार कायम राहिल्याचे दिसून येते. ह्यावरून असे म्हणता येईल की, व्यक्तिमत्वाचे मूळ केंद्र जन्मतःच अस्तित्वात असते. जन्मानंतर एक वर्षाच्या अवधीत काही व्यक्तिमत्व लक्षणे विकसित होऊ लागतात. वाढत्या वयानुसार निरनिराळ्या लक्षणांचा परिपोष होऊ लागतो. निरनिराळ्या वयोमानाच्या पातळीवर नवीन नवीन लक्षणे निर्माण होऊन व्यक्तिमत्वाची घडण होते. व्यक्तिमत्वाचे

मूळ केंद्र हे सुप्त घटकांनी तयार झालेले असून त्यांचे स्वरूप प्रेरणात्मक असते. व्यक्तिमत्वाचा हा प्रमुख प्रवाह होय. ह्या प्रमुख प्रवाहाभोवती निरनिराळी लक्षणे संयुक्त होऊन व्यक्तिमत्वाला वैशिष्ट्यापूर्ण आकार प्राप्त होतो. अशाच या व्यक्तिमत्व विकासाला प्रभावित करणारा एक सामाजिक घटक म्हणजे शाळा होय.

**व्यक्तिमत्वावर शालेय वातावरणाचा पडणारा प्रभाव :**

मुलांच्या व्यक्तिमत्वावर शालेय वातावरणाचाही फार प्रभाव पडतांना आपल्याला दिसतो. शालेय वातावरणातील महत्वाचे घटक म्हणजे शिक्षक व इतर मित्रपरिवार होय.

**अ) शिक्षक :**

ज्याप्रमाणे घरी मुलांच्या डोळ्यासमोर आईवडिलांचा आदर्श असतो त्याचप्रमाणे शाळेत त्यांच्यासमोर शिक्षकांचा आदर्श असतो. कठोर शिक्षा करणारे किंवा टाकून बोलणारे शिक्षक मुलांना आवडत नाहीत, इतकेच नव्हे तर त्यांच्याबद्दल सूडाची भावना त्यांच्या मनात निर्माण होते. याउलट चांगल्या शिक्षकांबद्दल त्यांच्या मनात आदरभाव व निष्ठा निर्माण होतात. शिक्षकांचे व्यक्तिमत्व आणि त्यांच्याकडून मुलाला दिली जाणारी वागणूक या दोन्ही गोष्टींचा मुलांच्या व्यक्तिमत्वावर परिणाम होतो. ज्ञान व बुध्दी या दोन्ही दृष्टीने शिक्षक मुलापेक्षा श्रेष्ठ असतो व मुलावर त्याचा बराच अधिकार चालतो. अर्थातच शिक्षकाला आदर्शरूप समजून त्याच्याच सारखे आपणही ज्ञान, बुध्दी व बळ प्राप्त करावे अशी मुलाच्या मनात इच्छा निर्माण होते. कुटुंबात आईवडिलांशी त्याचे जसे तादात्म्य होते तसेच शाळेत शिक्षकांशीही तादात्म्य होते. शिक्षकांचे व्यक्तिमत्व प्रभावी असेल तर अशा तादात्म्यामुळे मुलाच्या व्यक्तिमत्वालाही योग्य वळण लागते. परंतु याउलट शिक्षकांचेच व्यक्तिमत्व क्षुद्र असेल तर मुलाच्या व्यक्तिमत्वावर त्याचा चांगला ठसा उमटू शकत नाही. शिक्षकांच्या विचारांचा व नैतिक आचरणाचा मुलाच्या विचार व नैतिक आचरणावर प्रभाव पडतो. म्हणूनच शालेय वातावरणात शिक्षकांनी आपली वागणूक चांगली ठेवून त्याचा चांगला परिणाम मुलांवर कसा होईल याचा सदैव प्रयत्न केला पाहिजे. शालेय वातावरणात शिक्षकांचाच प्रभाव मुलांवर पडतो असे नाही तर शाळेत येणाऱ्या मित्र परिवारांचाही प्रभाव मुलांवर पडतांना आपल्याला जाणवतो.

**ब) मित्रपरिवार :**

मैत्री ही मानवी जीवनातील जमेची बाजू होय. मैत्रीच्या आधारावरच व्यक्ती जीवनातील सुख-दुःखाचा प्रवास सहजरित्या करू शकते. आपले सुख आणि दुःख मित्राजवळ मनमोकळेपणाने व्यक्त करू शकते. पण तोच जर आपल्या भावनेशी खेळला किंवा आपल्या उणीवेची चारचौघात वाच्यता केली तर आपण अडचणीत यायला फारसा वेळ लागत नाही. तेव्हा मित्राला किती आणि कितपत सांगावे, याचा देखील पुरेपूर विचार करायला हवा. अन्यथा पुढे त्याच्या नावाने शंख करायची वेळ आपल्यावर यायला नको. चांगली मैत्री करून टिकविणे हे उत्तम व्यक्तिमत्वाचे लक्षण आहे. व्यक्तिमत्व विकासाच्या प्रक्रियेत जशी मैत्रीत सावधानता अत्यावश्यक आहे, त्याचप्रमाणे मैत्री टिकवून ठेवणे ही देखील एक कला आहे.

शाळेत मुलाचा इतर विद्यार्थ्यांशी संबंध येतो. त्याच्या मित्रापैकी काही विद्यार्थी त्याच्याच वर्गातील असतात तर काही वरच्या किंवा खालच्या वर्गाचे असतात. वरच्या वर्गातील किंवा वयाने मोठी असलेली मुले इतर मुलांवर अधिकार गाजवितात. त्यांचे वर्तन स्नेहयुक्त असू शकते. त्याचप्रमाणे निर्दयतेचेही असू शकते. लहान किंवा खालच्या वर्गातील मुले मोठ्या मुलांना घाबरून असतात. भीती किंवा आदराच्या पोटी ही नम्रता निर्माण झालेली असू शकते. आपल्या वर्गातील इतर विद्यार्थ्यांशी अभ्यासाच्या बाबतीत मुलगा स्पर्धा करू लागतो. ह्या स्पर्धेमुळे द्वेष असूनही किंवा वैरभाव वाढण्याची शक्यता असते. त्याचप्रमाणे परिश्रमशीलता व चिकाटीही वाढीला लागते.

अभ्यासाव्यतिरिक्त क्रीडासमूहात विद्यार्थ्यांचे जे परस्परसंबंध येतात त्यांचा मुलाच्या व्यक्तिमत्वावर तीव्र प्रभाव पडतो. एकमेकांच्या बरोबरीने खेळणाऱ्या वा खोड्या करणाऱ्या मुलांच्या टोळ्या शालेय वातावरणात लवकरच निर्माण होऊ लागतात. या टोळ्यांचीही आपसात स्पर्धा असते. टोळीतील सदस्यांमध्येही नेतृत्वाकरिता संघर्ष निर्माण होतो. प्रत्येक टोळीतील निरनिराळ्या मुलांना निरनिराळा दर्जा प्राप्त होतो. ह्या दर्जाप्रमाणे मुलांची कार्ये निरनिराळी असतात. टोळीच्या अंतर्गत वर्तुळातील काही खास सदस्य असतात तर इतर सदस्य केवळ मनधरणी करून त्या टोळीत आपला समावेश व्हावा म्हणून धडपडत असतात. टोळीचा नेता व त्याचे घनिष्ठ मित्र आपल्या टोळीच्या धोरणांची आखणी करीत असतात. टोळीच्या कार्याचे नेतृत्व नेता करतो. नेत्याच्या धोरणांनुसार टोळीच्या कार्याची दिशा ठरते. तो जर साहसी व अविचारी असला तर टोळीच्या निरनिराळ्या कार्यांना अनिष्ट वळण लागू शकते. टोळीतील इतर मुलांची कार्ये त्यांच्या सामर्थ्यानुसार निश्चित होतात. मुलांना त्यांच्या टोळीतील नेत्याच्या व्यक्तिमत्वानुसार टोळीत आपआपली कार्ये पूर्ण करावी लागतात. परंतु बरेचदा त्यांच्यावर जो कार्यभाग सोपविला जातो त्याचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर सुध्दा परिणाम होतो. कित्येक टोळ्यांचे कार्य अपराधी स्वरूपाचे किंवा समाजविघातक आढळून येते. अशा टोळ्यांचे नेतृत्व करणाऱ्या मुलांचा कल नेहमीचे गुन्ह्याकडे असतो. व त्यांच्या सोबत राहून इतरही मुलांची गुन्ह्याकडे प्रवृत्ती वाढत जाते. धाडसाच्या आकर्षक कल्पना त्यांच्या मनात हळूहळू निर्माण होतात. यातूनच गुन्हेगारी प्रवृत्तीचे बीजारोपण टोळीतील सदस्यांच्या मनात निर्माण होऊ लागते. अशाप्रकारे शिक्षक व मित्र परिवार ह्यांचा मुलाच्या सामाजिक जीवनावर परिणाम होऊ शकतो. मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर आणि चारित्र्य संपादनावर कमी अधिक प्रमाणात स्थायी स्वरूपाचा

प्रभाव पाडणारे हे शालेय वातावरणातील प्रमुख घटक होत.

**निष्कर्ष :**

अशाप्रकारे शालेय वातावरणातील महत्वाचे समजल्या जाणारे शिक्षक व मित्र या घटकांचा परिणाम मुलांच्या व्यक्तिमत्व विकासावर होत असतो. शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत राहतांना आपण विद्यार्थ्यांसमोर एक आदर्श आहो याचे भान ठेवणे जरूरीचे आहे. तरच शिक्षकांचा मुलांच्या व्यक्तिमत्वावर चांगला परिणाम होऊ शकतो. याशिवाय मैत्रीच्या बाबतीत व्यक्तिजवळ मानसशास्त्रीय दृष्टीकोन असावा. कारण समाजात विविध स्तरातील आणि घरातील व्यक्ती असतात. त्या विभिन्न वातावरणात लहानाच्या मोठ्या होतात. घरून आणि बाहेरून त्यांच्यावर निरनिराळे संस्कार झालेले असतात. तेव्हा मैत्री करतांना व्यक्तीची मानसिकता ही फार मोठ्या प्रमाणात जागरूक असावी. मुलांनी हलक्या आणि संस्कारहीन व्यक्तींशी मैत्री किंवा उठबस केली तर त्याच्या व्यक्तिमत्वाचा आणि विचारांचा प्रभाव नकळत त्यांच्या मनावर व अंतर्मनावर होतो आणि त्यांची वागणूक पुढे मागे त्यांच्यासारखी होते. त्यामुळे मुलांच्या चांगल्या व्यक्तिमत्वाचे पतन होण्यास फारसा वेळ लागत नाही.

**संदर्भ ग्रंथ सूची :**


१. काळे, दिनेश, 'व्यक्तिमत्व विकास' ,विजय प्रकाशन, नागपूर.

२. तळवलकर, माधुरी, 'व्यक्तिमत्व फुलताना' ,डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

३. कुंटे, माधवी, 'सुदृढ मानसिकतेसाठी', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

४. उकीनकर डॉ. वसंत, सुरकार डॉ. अनिल, बेले, प्रा. आकाश, 'कौशल्य विकास', साई ज्योती पब्लिकेशन, नागपूर.


☆☆☆